Agrowon Dt. 27/09/2022

# शेतमाल काढणीपश्चात तंत्रज्ञानावर लक्ष द्या

## दीपक शिंदे : सोलापुरात राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचा वर्धापनदिन

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

सोलापूर : फळे वा भाज्यांचे गुणवत्तापूर्ण उत्पादन महत्त्वाचे आहेच, पण काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा योग्य वापर होत नसल्याने वर्षाकाठी सुमारे साडेचार हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक शेतमालाचे नुकसान होते, हे नुकसान टाळण्यासाठी काढणीपश्चात तंत्रज्ञानावर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे, असे मत राज्य कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक आणि मॅग्नेट प्रकल्पाचे संचालक दीपक शिंदे यांनी रविवारी (ता. २५) व्यक्त केले.



**सोलापूर : राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या वर्धापनदिनानिमित्त रविवारी (ता. २५) आयोजित कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करताना पुष्प विज्ञान संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे, डाळिंब केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे, प्रभाकर चांदणे, शहाजीराव जाचक आदी.**

सोलापुरातील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या १७ व्या वर्धापनदिनानिमित्त डाळिंबबाग व्यवस्थापनाच्या उत्कृष्ट पद्धती यावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री. शिंदे बोलत होते. पुण्यातील पुष्प विज्ञान संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद अध्यक्षस्थानी होते. अखिल भारतीय डाळिंब संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे, राज्य डाळिंब संघाचे माजी अध्यक्ष शहाजीराव जाचक, उपाध्यक्ष प्रतापराव काटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, डाळिंब केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे यावेळी व्यासपीठावर होते.

श्री. शिंदे म्हणाले, फलोत्पादक शेतकऱ्यांसाठी मॅग्नेट प्रकल्प फायदेशीर आहे. या प्रकल्पासाठी ११०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. डाळिंब, द्राक्ष, चिक्कू, पेरूसह दहा फळांचा त्यात समावेश आहे. त्यातून सुमारे ६० टक्क्यांपर्यंतचे अनुदान मिळणार आहे. शिवाय निव्वळ ४०० कोटी रुपये खेळते भांडवल म्हणून ठेवण्यात आले आहेत. वातावरणातील बदलांमुळे शेतकऱ्यांना उत्पादनात अडचणी आहेत, नैसर्गिक आपत्तीचा फटका बसतो आहे.

श्री. प्रसाद म्हणाले, की देशभरात फुलांचे उत्पादन जवळपास तीन लाख हेक्टरवर घेतले जाते. फळे किंवा फुलांचे उत्पादन हे व्यापारी तत्त्वावर घेतले पाहिजे. तरच त्यातून जादाचे पैसे मिळतील. डाळिंबाने सोलापूरसह कोरडवाहू शेतीला दिशा दिली आहे. औषधी गुणधर्म असणारे डाळिंब बहुउपयोगी आहे.

प्रास्ताविकात केंद्रसंचालक डॉ. मराठे यांनी संशोधन केंद्राच्या कामकाजाचा आढावा घेतला. वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. निलेश गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. ज्योत्सना शर्मा यांनी आभार मानले. तांत्रिक सत्रांमध्ये डाळिंबातील दर्जेदार रोपांचे उत्पादन याविषयावर डॉ. एन. व्ही. सिंह, डाळिंबातील रोग व्यवस्थापनावर डॉ. ज्योत्सना शर्मा, डाळिंबातील सूत्रकृमी व्यवस्थापनावर डॉ. सोमनाथ पोखरे, डाळिंबातील विविध किडींचे व्यवस्थापनाविषयी डॉ. मल्लिकार्जुन, काढणीपश्चात व्यवस्थापन व मूल्यवर्धनावर डॉ. निलेश गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

### रिझल्टचे प्रात्यक्षिक प्लॉट दाखवा

यावेळी श्री. चांदणे यांनी संशोधन केंद्राच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त केली ते म्हणाले, संशोधन केंद्राच्या एवढ्या वर्षानंतरही तेलकट डाग, मर, पिनहोल बोरर यासारख्या कीड-रोगावरील उपाय मिळालेला नाही, आम्ही सातत्याने पाठपुरावा करतो आहोत. पण ठोस काहीच मिळत नाही. आतापर्यंत केंद्राने सोलापूर लाल आणि सोलापूर अनारदाणा ही दोन वाणे संशोधित केली. पण त्याची साईज कमी आहे. त्याचा मार्केटसाठी उपयोग होत नाही. कीड-रोगावरील उपायांबाबत संशोधन केंद्राने पेटंट मिळवल्याचं सांगितलं जातं. पण मूळात आम्हाला त्याची प्रात्यक्षिकं दाखवा, केवळ आश्वासने नको, व्यावसायिक पद्धतीने एखाद्या प्लॉटवर त्याची प्रात्यक्षिके घेऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यांना त्याचे रिझल्ट दाखवा, असेही ते म्हणाले.

पुढारी

# शेतीमाल मूल्यसाखळी वाढीसाठी मॅग्नेट प्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरू

## पहिल्या टप्प्यातील २ संस्थांना अडीच कोटीपर्यंत अनुदान मंजूर

**कोल्हापूर : डी. बी. चव्हाण**

राज्यातील फळे, भाजीपाला व फुले या शेतीमालाच्या उत्पादनावर प्रक्रिया करणे आणि स्थानिक बाजारपेठेसह निर्यातीला प्रोत्साहन मिळावे यासाठी शासनाने कृषी पणन मंडळामार्फत मॅग्नेट प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पाचा आता दुसरा टप्पा सुरू करण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील वारणानगर एक व चंदगडमधील एक अशा दोन कंपन्यांचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. या दोन कंपन्यांचे ४ कोटीचे हे प्रस्ताव होते. त्यातील अडीच कोटी रुपये त्यांना अनुदान स्वरूपात व दीड कोटी रुपये शेतकरी उत्पादक कंपन्यांनी गुंतवणूक करावयाची आहे. त्यासाठी वित्तीय संस्थांनी कर्जपुरवठा करण्याची तयारी दर्शवली आहे. दुसऱ्या टप्प्यात ६० संस्था निवडण्यात येणार आहेत. एकूण ६ वर्षांसाठीचा हा प्रकल्प आहे. त्यासाठी शासनाने १ हजार ६७ कोटींचा निधी मंजर केला आहे.

### कोणाला सहभागी होता येणार...

मॅग्नेट प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात शेतकरी उत्पादक कंपन्या, संस्था लोकसंचलित साधन केंद्र, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत स्थापित प्रभाग संघ, उत्पादकांच्या सहकारी संस्था, प्रक्रियादार, निर्यातदार, ॲग्रिगेटर, मध्यम व मोठ्या रिटेल विक्री संस्था, कृषी तंत्र वा आर्थिक तंत्र संस्था या संस्थांना या प्रकल्पासाठी अर्ज करता येणार आहेत.

> शेतीमाल काढल्यानंतर त्याला योग्य भाव मिळण्यासाठी जी मूल्यसाखळी निर्माण करणे आवश्यक असते, त्यासाठी कृषी पणन मंडळाकडून मॅग्नेट प्रकल्प सुरू केला आहे. शेतकऱ्यांसाठी खूप लाभदायक असा प्रकल्प असून जास्तीत जास्त शेतकरी उत्पादक कंपन्यांनी याचा लाभ घ्यावा, आपले प्रस्ताव मंडळाच्या मार्केट यार्ड येथील कार्यालयाकडे सादर करावेत.
>
> **-डॉ. सुभाष घुले,** विभागीय व्यवस्थापक कृषी पणन मंडळ.

गतवर्षी राज्यातील अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी मंडळाकडे प्रस्ताव सादर केले होते. त्यातील २५ कंपन्या व ५ इतर संस्था अशा ३० संस्थांचे एकुण २३० कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर केले आहेत. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील वारणानगर, चंदगड येथील दोन संस्थांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी ६० लाभार्थींमध्ये ४० शेतकरी उत्पादक संस्था व २४ मूल्यसाखळी गुंतवणूकदारांचा समावेश असणार आहे. यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांनी १० ऑक्टोबरपर्यंत प्रस्ताव सादर करावयाचे आहेत.

मॅग्नेट प्रकल्पाचा मुख्य उद्देश मुल्यसाखळ्यामध्ये खासगी गुंतवणूक वाढविणे, पीक काढणीपश्चात नुकसान कमी करणे व साठवणूक क्षमता वाढविणे असा आहे. मागणीनुसार मालाची मूल्यवर्धी करणे, अन्नाची वितरण व्यवस्था कार्यक्षम करणे व शेतकरी उत्पादक संस्थाचा मूल्यसाखळीतील सहभाग वाढविणे असा हेतू आहे.

**कुठले प्रस्ताव सादर करता येणार?**

कोल्हापूर विभागातील डाळींब, केळी, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल), फूल पिके आदी पिकांचा मॅग्नेट प्रकल्पात समावेश आहे. इच्छुकांना या शेतीमालावर प्रक्रिया करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करता येणार आहेत.

My Kolhapur Edition
Sep 25, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# 'सह्याद्री फार्म्स'मध्ये ३१० कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक

## युरोपातील चार गुंतवणूकदारांचा समावेश

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

Sahyadri farms
Seeding goodness

नाशिक : सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनीची १०० टक्के मालकी असलेल्या 'सह्याद्री फार्म पोस्ट हार्वेस्ट केअर लि.' या कंपनीमध्ये युरोपातील गुंतवणूकदारांच्या समूहाने ३१० कोटींची थेट परकीय गुंतवणूक केली आहे. इंकोफिन, कोरीस, एफएमओ आणि प्रोपार्को या गुंतवणूकदारांचा त्यामध्ये समावेश आहे. व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून फायदेशीर आणि शाश्वत स्वरुपात चालविण्याच्या सह्यांद्रीच्या भूमिकेवर या गुंतवणुकीमुळे शिक्कामोर्तब झाले आहे.

छोट्या आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना साह्य प्रदान करणारे मॉडेल विकसित केले आहे. सुरुवातीला २०१० मध्ये दहा शेतकऱ्यांच्या छोट्या गटाने एकत्र येत युरोपात द्राक्षनिर्यात केली. त्याचा विस्तार होत सह्याद्री फार्म्सच्या रूपाने देशातील आघाडीची फळे व भाजीपाला निर्यात आणि प्रक्रिया करणारी कंपनी बनली आहे. सध्या ९ पिके, १८ हजार शेतकरी आणि ३१ हजार एकरांहून अधिक क्षेत्रावर विस्तार झाला आहे. गुंतवणूकदारांकडून सह्याद्री फार्म्समध्ये झालेली भांडवली गुंतवणूक शेतकरी कंपनीची आणखी वाढ करण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. त्यातून प्रक्रिया, फळे आणि भाजीपाला उत्पादन क्षमतावाढ, तसेचप्रक्रिया पश्चात कचऱ्यापासून

पान ४ वर »

**"शेतकऱ्यांना संघटित करून उद्योजकांप्रमाणे व्यावसायिकदृष्ट्या विचार करून कामकाज करणे ही सह्याद्रीची मूळ संकल्पना आहे. शेती हा फायदेशीर आणि व्यावहारिक व्यवसाय बनावा या उद्देशाने एक शाश्वत आणि मोठ्या प्रमाणात वाढ होणारी सक्षम अशी संस्था विकसित करीत आहोत.**

**-विलास शिंदे,** अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक-सह्याद्री फार्म्स

**"भारतीय शेतकरी उत्पादक कंपनीत या गुंतवणुकीमुळे अनेक सकारात्मक सामाजिकआणि पर्यावरणपूरक परिणाम होणार आहेत. सुरुवातीला जवळपास १५ हजार शेतकरीआधुनिक पुरवठा साखळीत प्रवेश करून सक्षम होतील.शेतकऱ्यांना उत्पादने आणि त्यांची गुणवत्ता वाढ शक्य होईल. शिवाय ऊर्जा उत्पादनातील हिस्सा ५० टक्क्यांहून अधिक वाढवून शेवटी शून्य कचरा धोरणाची अंमलबजावणीही शक्य होईल.**

**- फ्रँकोइस लोम्बार्ड,** मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रोपार्को

# 'सह्याद्री फार्म्स'मध्ये ३१० कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक

**» पान १ वरून**

वीजनिर्मितीसाठी बायोमास प्लांट आणि पॅकहाउससारख्या पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी या गुंतवणुकीचा उपयोग केला जाणार आहे. गुंतवणूक प्रक्रियेत 'अल्पेन कॅपिटल'ने सह्याद्री फार्म्ससाठी विशेष धोरणात्मक सल्लागार म्हणून काम केले.

**"सह्याद्री फार्म्सच्या संकल्पनेचा कृषी क्षेत्रात वैश्विक रोल मॉडेल म्हणून प्रसार व्हावा. ज्यातून शाश्वत आर्थिक प्रगती, हवामान बदलासाठी अनुकूल व ग्रामीण समुदायात सर्वसमावेशक विकास साध्य केला जाईल. तसेच शेती क्षेत्राचा तंत्रज्ञान आधारित आणि जागतिक स्पर्धाक्षम व्यवसायाची वृद्धी होईल.**

**- राहुल राय,** पार्टनर-इंकोफिन इंडिया

**भारतातील शेतकऱ्यांचे नेतृत्व करणाऱ्या एका संस्थेमध्ये झालेली ही पहिली आंतरराष्ट्रीय भांडवली गुंतवणूक आहे. सह्याद्री फार्म्स आणखी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास आणि कृषी उद्योगाच्या पुढील वाढीसाठी 'ब्लू प्रिंट' तयार करण्यात नक्कीच उपयुक्त ठरेल. छोट्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी सह्याद्री फार्म्सच्या रूपाने दीर्घकालीन भागीदार मिळाल्याबद्दल खूप आनंद झाला आहे.**

**- मायकेल जोन्गेनील,** मुख्य कार्यकारी अधिकारी, एफएमओ

**सह्याद्रीची वाटचाल शेतकरी ते उद्योजक अशी प्रेरक आहे. अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करून पारंपरिक शेतीचे रूपांतर करण्याचा दृष्टिकोन अंगीकारला आहे. कृषी मूल्यसाखळीत पारदर्शकता आणण्यात आणि मुख्यत्वे शेतकऱ्यांच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांची कंपनी म्हणून विकसित करण्यासाठी वचनबद्ध आहे.**

**- हरी सुब्रमण्यम,** पार्टनर-कोरीस, इंडिया

Agrowon Dt. 15/09/2022

Agrowon Dt. 12/09/2022

# सहकारातूनच समृद्धी

**सहकार हा आपल्या देशात कोणत्याही परिस्थितीमध्ये विकासाचा मधला मार्ग राहिला आहे.**

केंद्रीय सहकार मंत्रालयाची वर्षभरापूर्वी म्हणजे जुलै २०२१ मध्ये स्थापना करण्यात आल्यानंतर देशात नवे सहकार धोरण आणण्याबाबत केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शहा यांनी अनेक वेळा बोलून दाखविले. या मंत्रालयाचा उद्देशच सहकारातून समृद्धी साकार करण्याचा आहे. आणि हा उद्देश साध्य करायचा असेल तर देशातील सहकार चळवळ मजबूत करावी लागेल, सहकारी संस्थांना व्यवसाय सुलभ, प्रक्रिया सुलभ करावे लागेल. २००२ च्या जुन्या सहकार धोरणात व्यावसायिकता आणि पारदर्शकता नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. ही व्यावसायिकता आणि पारदर्शकता त्यांना नव्या सहकार धोरणाद्वारे आणायची आहे. देशात सहकारी क्षेत्रावर कॉंग्रेस, तसेच राज्याराज्यांतील स्थानिक पक्षांची पकड आहे. त्यामुळेच सहकारी संस्था संगणकीकरणाने जोडून त्यांचा डाटाबेस तयार करायचा, शिवाय देशभरातील सहकारी संस्थांमधील भरती आणि निवडणूक प्रक्रियेमध्ये बदल करून सहकार क्षेत्रावर आपली पकड घट्ट करण्याचा देखील हेतू या नव्या मंत्रालयामागे असल्याचे काही लपून नाही. याकरिता त्यांना देशभरातील सहकार कायद्यामध्ये एकजिनसीपणा देखील आणायचा आहे. असे केल्याने मुळातच भाजपप्रणित आणि भाजपेतर राज्यांमध्ये असलेला संघर्ष अजून वाढू नाही, याची काळजी केंद्र सरकारला घ्यावी लागेल.

देशाचा समतोल विकास हा साम्यवादी वा भांडवलशाही व्यवस्थेतून शक्य नाही, हे मान्यच आहे. परंतु त्याचवेळी केंद्र सरकारकडून अनेक सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण सुरू आहे. महत्त्वाचे म्हणजे या खासगीकरणाचा लाभ काही ठरावीक उद्योजक घराण्यांना होतोय. सहकार हा आपल्या देशात तर कोणत्याही परिस्थितीमध्ये विकासाचा मधला मार्ग राहिला आहे. सरकारी ध्येयधोरणे, व्यावसायिकता, निर्णय प्रक्रियेचा अभाव अशा काही कारणांनी मागील काही वर्षांपासून सहकार क्षेत्राला मरगळ आलेली आहे. अशावेळी सहकारला सक्षम बनविण्यासाठीचे प्रयत्न निश्चितच झाले पाहिजेत. परंतु त्याच वेळी सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण थांबवून देशात उद्योग-व्यवसायाचा विकेंद्रित विकास साधला गेला पाहिजेत, हेही पाहावे लागेल.

राज्यात शेतकरी-शेतीचा कर्जपुरवठा विस्कळीत झाला आहे. पीककर्ज शेतकऱ्यांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात मिळत नाही. राष्ट्रीयीकृत बँका थेट शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्याऐवजी कृषी उद्योग, उद्योजकांना कर्ज देऊन आपले शेतीसाठीच्या कर्जपुरवठ्याचे उद्दिष्ट साध्य झाल्याचे दाखवितात. सोने तारण कर्जात व्यापारी बँकांकडून शेतकऱ्यांची सर्रास लूट होते आहे. अशावेळी कृषी सहकारी सोसायट्यांमार्फत शेतकऱ्यांना अल्पमुदतीबरोबर मध्यम आणि दीर्घकालीन कर्जपुरवठ्याचा सहकार मंत्रालयाचा विचार चांगलाच म्हणावा लागेल. राज्यातील सहकाराचा कणा राज्य बँकेला मानले जाते तर या व्यवस्थेतील सर्वांत शेवटचा घटक सहकारी सोसायट्या आहेत. त्रिस्तरीय पतपुरवठ्याची व्यवस्था म्हणून राज्यातील गावागावांत विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या निर्माण झालेल्या आहेत. बहुतांश सोसायट्यांनी बराच काळ शेतीसाठी पीककर्ज पुरवठ्याचे चांगले काम केले. परंतु मागील दोन दशकांत शेतकऱ्यांकडून प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब वाढत आहे, त्यांच्याकडून विविध निविष्ठा, ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचलित यंत्रे-अवजारे, फवारणी यंत्रे यांची मागणी वाढत आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांना जमीन सुधारणा करायची आहे. या सर्वांसाठी शेतकऱ्यांना मध्यम, दीर्घ मुदतीच्या कर्जांची गरज आहे. नेमक्या अशावेळी त्यांना सोसायट्यांकडून मध्यम, दीर्घ मुदतीचे कर्ज मिळाले तर त्याचे स्वागतच करायला पाहिजेत. परंतु राज्यातील सोसायट्यांची अवस्था वाईट आहे. मागील काही वर्षांत विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांचे राज्यातील जाळे खिळखिळे करण्याचे काम राजकीय आकसापोटी केंद्र सरकारनेच केले आहे. राज्य बँक आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत असली तरी अनेक जिल्हा बँका डबघाईला आलेल्या आहेत. अनेक सेवा सहकारी सोसायट्याही बंदच आहेत. कृषी सहकारी सोसायट्यांमार्फत मध्यम, दीर्घ मुदतीच्या पतपुरवठा करायचा असेल तर राज्यात त्रिस्तरीय पतपुरवठ्याची घडीसुद्धा नीट बसवावी लागणार आहे.

www.agrowon.com
सकाळ
मित्र ग्लोबल शिवाराचा..
ॲग्रोवन
बुधवार, ७ सप्टेंबर २०२२ । पाने १६ । किंमत ₹ ३ ।

मराठवाडा

# शेतकऱ्यांनी प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य द्यावे

## जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांचे आवाहन

औरंगाबाद : ''मराठवाड्यात मोसंबीची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. शेतकऱ्यांनी प्रक्रिया करून बाजारपेठेमध्ये मोसंबी विकल्यास चांगली किंमत (दर) मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीबरोबरच प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य द्यावे,'' असे आवाहन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी केले.



औरंगाबाद : मोसंबी प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी सुनील चव्हाण. या वेळी उपस्थित मोसंबी उत्पादक.

महाराष्ट्र शासन व आशियायी विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पातर्फे (मॅग्नेट) 'मोसंबी फळपीक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी, प्रक्रिया संबंधी कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. त्याचे उद्घाटन चव्हाण यांच्या हस्ते झाले.

चव्हाण म्हणाले, ''मराठवाड्यात मोसंबी उत्पादनात ५ जिल्हे अग्रेसर आहेत. ४८ हजार हेक्टर क्षेत्रातून सुमारे साडेचार लाख मेट्रीक टन मोसंबीचे उत्पादन घेण्यात येते. केंद्र सरकारने देखील कृषी मालाची निर्यात दुप्पट करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे प्रक्रिया करून मोसंबी विकल्यास शेतकऱ्यांच्या नफ्यात नक्कीच वाढ होईल. आशियायी विकास बँकेने देखील सार्वजनिक क्षेत्रात पायाभूत सुविधांसाठी गुंतवणूक करण्यावर भर दिला आहे. शेती क्षेत्रामध्ये क्षमता बांधणी आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून गटशेतीला प्राधान्य द्यावे. त्यामुळे उत्पादन खर्च कमी येऊन उत्पादनात वाढ होते.''

Aurangabad Dt. 06/09/2022

# प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य द्या

## जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांचे आवाहन



औरंगाबाद -मोसंबी फळपिक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी, प्रक्रिया संबंधी कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण यांनी उदघाटन केले. यावेळी उपस्थित प्रकाश देशमुख, दीपक शिंदे, संजय पाटील सोयगावकर आदी.

औरंगाबाद, ता. ५ : मराठवाड्यात मोसंबीची मोठ्या प्रमाणात लागवड केली जात आहे. बाजारपेठेमध्ये मोसंबी कच्चा मालाच्या स्वरुपात विक्रीसाठी नेण्यापेक्षा प्रक्रिया करुन विकल्यास चांगला भाव मिळेल म्हणून शेतीबरोबरच प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी केले.

महाराष्ट्र शासन व आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' मोसंबी फळपिक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी, प्रक्रिया संबंधी कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, की मराठवाड्यात मोसंबी उत्पादनात ५ जिल्हे अग्रेसर असून ४८ हजार हेक्टर क्षेत्रातून सुमारे साडेचार लाख मेट्रीक टन मोसंबीचे उत्पादन घेण्यात येते. आशियाई विकास बँकेने देखील सार्वजनिक क्षेत्रात पायाभुत सुविधांसाठी गुंतवणूक करण्यावर भर दिला आहे. जिल्हाधिकारी म्हणाले की मोसंबीचे दर हेक्टरी ८ ते १० टन उत्पादन घेतले जात असून हेच प्रमाण ४० टनापर्यंत नेणे आवश्यक आहे. प्रास्ताविकात बोलताना मॅग्नेटचे प्रकल्प संचालक दिपक शिंदे यांनी आशियाई विकास बँकेकडून मुल्यसाखळी विकसित करण्यासाठी १ हजार कोटीचे अर्थसहाय्य मिळणार असल्याचे सांगितले.

लोकमत

### पणन मंडळाकडून प्रथमच क्रमवारी : पुणे विभागात अव्वल

# बारामती बाजार समिती 'स्मार्ट' प्रकल्पात राज्यात नववी

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती** : बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत पहिल्या दहामध्ये बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने स्थान पटकावले आहे. बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्यात ९ वे तर पुणे विभागामध्ये प्रथम स्थान पटकावले आहे. राज्यभरातील बाजार समित्यांची त्यांच्या सन २०२१-२२ या वर्षाच्या आर्थिक कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी पणन संचालनालयाकडून नुकतीच जाहीर करण्यात आली आहे.

राज्यातील एकूण ३०५ बाजार समित्यांपैकी नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजार समितीने राज्यात पहिला क्रमांक पटकाविला असून, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट बाजार समितीने दुसरा तर वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) बाजार समितीने तिसरा क्रमांक मिळवला आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यामध्ये बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन अर्थात स्मार्ट प्रकल्प सुरू आहे. स्मार्ट प्रकल्पाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध केली जाते. बाजार समित्याची क्रमवारी निश्चित करण्यासाठी पणन संचालनालय कार्यालयाकडून जागतिक बँकेच्या सूचनेनुसार तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, योजना, उपक्रम राबविण्यातील सहभाग यानुसार ३५ निकष तयार करण्यात आलेले होते. या निकषाच्या माहितीची संबंधित तालुका उप किंवा सहायक निबंधक यांच्याकडून तपासणी करण्यात आली.

बाजार समितींना एकूण २०० गुणांपैकी गुण देण्यात आलेले आहेत. या गुणांच्या आधारावर राज्यातील बाजार समित्यांची सन २०२१-२२ या वर्षीची क्रमवारी निश्चित करण्यात आलेली आहे. यामध्ये लासलगाव (१६३ गुण), हिंगणघाट (१६१ गुण), करंजा लाड (१६१ गुण) तर बारामती १४९.५० गुणांसह राज्यात ९ वे तर पुणे विभागामध्ये प्रथम स्थान पटकावले आहे. पुणे विभागामध्ये बारामती खालोखाल दौंड (१४३ गुण), अकलूज जि. सोलापूर (१३७ गुण) अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावले आहे.



## दरवर्षी होणार क्रमवारी निश्चित...

- बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर झाल्यामुळे इतर बाजार समित्यांच्या तुलनेत आपण शेतमाल नेत असलेल्या बाजार समितीचे स्थान शेतकऱ्यांना समजणार आहे. तसेच यामुळे शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्याची निकोप स्पर्धा बाजार समित्यांमध्ये निर्माण होण्यास चालना मिळणार आहे.
- बाजार समितीचा विकास करताना नेमक्या कोणत्या बाबींना प्राधान्य द्यावे, याची स्पष्टता या क्रमवारी (रँकिंग) मुळे बाजार समित्यांच्या संचालक मंडळास येणार आहे. राज्याच्या कृषी बाजार व्यवस्थेतील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे. यापुढे दरवर्षी अशा प्रकारे बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर करण्यात येणार आहे. असे देखील पणन विभागाने स्पष्ट केले आहे.

सकाळ

# लासलगाव बाजार समिती प्रथम

## पहिल्यांदाच बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर

**पुणे, ता. १ :** राज्यात पहिल्यांदाच पणन संचालनालयाने बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी (रँकिंग) जाहीर केली आहे. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजार समितीने राज्यातील ३०५ बाजार समित्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे तर पुणे जिल्ह्यातील बारामती बाजार समितीने नववा क्रमांक पटकाविला आहे.

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाअंतर्गत २०२१-२२ च्या कामगिरीच्या आधारावर ही वार्षिक क्रमवारी जाहीर केल्याची माहिती राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधांनुसार ३५ निकष आणि २०० गुणांच्या आधारे ही निवड करण्यात आली. यामध्ये पायाभूत सुविधा व इतर सेवासुविधा अंतर्गत १४ निकष आहेत.

> **जागतिक बँकेच्या मदतीने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. यामुळे शेतीमाल विक्रीसाठी नेत असलेल्या बाजार समितीचे स्थान शेतकऱ्यांना समजणार आहे. पणन संचालनालयाकडून यापुढे दरवर्षी बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर करण्यात येणार आहे.**
> **- सुनील पवार,**
> पणन संचालक, महाराष्ट्र राज्य

### बाजार समिती व मिळालेला क्रमांक

| | |
|---|---|
| लासलगाव (जि. नाशिक) | पहिला |
| हिंगणघाट (जि. वर्धा) | दुसरा |
| कारंजा लाड (जि. वाशिम) | तिसरा |
| संगमनेर (जि. नगर) | चौथा (विभागून) |
| मंगरुळपीर (जि. वाशिम) | चौथा (विभागून) |
| चांदूर बाजार (जि. अमरावती) | चौथा (विभागून) |
| वाशीम (जि. वाशिम) | चौथा (विभागून) |
| काटोल (जि. नागपूर) | पाचवा |
| अकोला (जि. अकोला) | सहावा |
| उमरेड (जि. नागपूर) | सातवा |
| लातूर (जि. लातूर) | आठवा |
| बारामती (जि. पुणे) | नववा |
| पिंपळगाव बसवंत (जि. नाशिक) | दहावा |

# ‘स्मार्ट’ प्रकल्पांतर्गत लासलगाव बाजार समिती राज्यात प्रथम

## पुणे बाजार समितीला पहिल्या दहामध्येही स्थान नाही

पुणे, दि. १ (प्रतिनिधी) – पणन संचालनालयाने हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाअंतर्गत राज्यभरातील बाजार समित्यांची २०२१-२२ या वर्षाच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी जाहीर केली आहे. राज्यातील एकूण ३०५ बाजार समित्यांपैकी नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजार समितीने पहिला क्रमांक पटकाविला. वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट बाजार समिती आणि वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) बाजार समितीने अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकविला आहे. पुणे जिल्ह्यातील बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती नवव्या स्थानावर आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीला पहिल्या दहामध्येही स्थान मिळू शकलेले नाही.

स्मार्ट प्रकल्पाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिध्द करणे हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी पणन संचालनालय कार्यालयाकडून जागतिक बँकेच्या सूचनेनुसार तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीतील पायाभूत व इतर सुविधांसह इतर कामकाजांनुसार ३५ निकष तयार केले होते. या निकषाच्या माहितीची संबंधित तालुका उप-सहायक निबंधक यांच्याकडून तपासणी करून क्रमवारी निश्चित केल्याची माहिती राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांनी कळविली.

बाजार समित्यांच्या क्रमवारीमुळे इतर बाजार समित्यांच्या तुलनेत आपण शेतमाल नेत असलेल्या समितीचे स्थान शेतकऱ्यांना समजणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्याची स्पर्धा बाजार समित्यांमध्ये निर्माण होण्यास चालना मिळणार आहे. बाजार समितीचा विकास करताना नेमक्या कोणत्या बाबींना प्राधान्य द्यायचे याची स्पष्टता या क्रमवारी (रँकिंग)मुळे बाजार समित्यांच्या संचालक मंडळास येणार आहे.

### या बाजार समित्या पहिल्या दहा क्रमांकामध्ये

■ निकष व गुणांच्या आधारावर राज्यातील बाजार समित्यांची सन २०२१-२२ या वर्षाची क्रमवारी (रँकिंग) निश्चित केली आहे. क्रमवारीनुसार राज्यातील पहिल्या १० बाजार समित्या पुढीलप्रमाणे – लासलगाव, हिंगणघाट, कारंजा, संगमनेर, मंगरुळपीर, चांदूर, वाशिम, काटोल, अकोला, उमरेड, लातूर, बारामती, पिंपळगाव.

### दरवर्षी बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर होणार

■ राज्याच्या कृषी बाजार व्यवस्थेतील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे. यापुढे दरवर्षी अशाप्रकारे बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर करण्यात येणार आहे. यावर्षी जाहीर करण्यात आलेल्या क्रमवारीच्या अनुभवाच्या आधारावर पुढील वर्षी क्रमवारीच्या निकषात आणि गुणांकन पद्धतीत आवश्यकतेनुसार काही सुधारणा करण्यात येणार असल्याचे पवार यांनी नमूद केले.

Samana Dt. 02/09/2022

# कृषी उद्योजकता विकासासाठी ‘मॅग्नेट’



**शेतीमालाच्या काढणीपश्चात तंत्रज्ञानाअभावी होणारे नुकसान टाळणे, तसेच शेतीमालाच्या मूल्यवर्धनातून शेतकऱ्यांना सामूहिक उद्योजक करण्यासाठी महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) राबविण्यात येत आहे. आशियायी विकास बँक आणि सहकार व पणन विभागाच्या संयुक्त विद्यमाने सुमारे एक हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. याविषयी प्रकल्प संचालक दीपक शिंदे यांच्यासोबत केलेली बातचीत...**

### ‘मॅग्नेट’ प्रकल्प नक्की काय आहे?

शेतकऱ्यांना भांडवल आणि कमी वित्तपुरवठ्याअभावी उत्पादनामध्ये सुधारणा करण्यास मर्यादा आहेत. तर उत्पादित शेतीमालास मूल्यवर्धनाअभावी चांगली बाजारपेठ आणि दर मिळत नाही, ही बाब लक्षात घेऊन आपल्या राज्यात महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) आशियायी विकास बँकेच्या सहकार्याने तसेच सहकार व पणन विभाग आणि स्वतंत्र मॅग्नेट सोसायटीद्वारे सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र व्हिजन -२०३० नुसार कृषी क्षेत्राचा विकास दर प्रतिवर्षी ५ टक्के प्रमाणे साध्य करणे अपेक्षित आहे. या उद्दिष्टानुसार प्रकल्पाची आखणी केली आहे. प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, फलोत्पादन व फूल पिकांची गुणवत्ता तसेच उत्पादन वाढ करणे, साठवणूक तसेच प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणी या बाबींचा समावेश आहे.

### प्रकल्पामध्ये कोणत्या फळ पिकांचा समावेश आहे?

डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल) फळपिके आणि फुले अशा एकूण अकरा पिकांसाठी उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण अशी एकात्मिक मूल्य साखळ्यांचा विकास विचारात घेऊन ‘मॅग्नेट’ प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे. यामध्ये अस्तित्वात असलेल्या आणि नव्याने निर्माण होणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था, निर्यातदार, प्रक्रीयादार, संघटित किरकोळ विक्रेते, कृषी व्यवसाय करणारे लघू व मध्यम उद्योजक, वित्तीय संस्था, स्वयंसाह्यता समूहांचा सहभाग आहे.

### प्रकल्पाचा वित्तीय आराखडा कसा आहे? किती वर्षांसाठी असणार आहे?

प्रकल्पासाठी सुमारे एक हजार कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी सुमारे ७०० कोटी रुपये आशियायी विकास बँकेकडून अल्प व्याज दराने कर्ज स्वरूपात मिळणार आहे. तर सुमारे ३०० कोटी रुपये निधी राज्य शासनाचा स्व-निधी असणार आहे. हा निधी सहा वर्षांसाठी म्हणजेच २०२६-२७ या वर्षांपर्यंत असणार आहे.

### ‘मॅग्नेट’द्वारे शेतकरी उत्पादक कंपन्या कोणते उद्योग, व्यवसाय करू शकणार आहे?

विविध शेतीमाल हाताळणी यंत्रणा, प्रशीतगृह, शीतगृह, रायपनिंग चेंबर, रेफर व्हॅन, फळे व भाजीपाला सुकविण्यासाठी यंत्रणा, दुय्यम प्रक्रिया यंत्रणा, आयक्यूएफ व फ्रोझन यंत्रणा, किरकोळ विक्रीसाठी पायाभूत सुविधा आदी क्षेत्रांत उद्योग करू शकणार आहे. यामध्ये डाळिंबाचे दाणे काढून पॅकिंग करून निर्यात करणे, स्ट्रॉबेरीची ताजी फळे तसेच फळांना गोठवून पॅकिंग करणे, केळी पॅकिंग करून स्थानिक व निर्यातीसाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे, संत्रा फळांचे वॅक्सिन व प्रतवारी, संत्रा फळापासून रस काढणे तसेच संत्रा सालापासून पावडरनिर्मिती, मिरची वाळवून पावडर, पॅकिंग करणे शक्य होणार आहे.

### आतापर्यंत किती प्रकल्पांना मंजुरी दिली आहे?

प्रकल्प सुरू झाल्यापासून पहिल्या टप्प्यात ३० प्रकल्पांना प्राथमिक मंजुरी देण्यात आली असून, त्यांची एकूण प्रकल्प किंमत सुमारे २३० कोटी रुपये एवढी आहे. यामध्ये निवड झालेले जिल्हानिहाय प्रकल्पांची संख्या : नाशिक (४), नगर (३), सोलापूर (३), ठाणे (३), अमरावती (२), औरंगाबाद (२), कोल्हापूर (२), नांदेड (२), सातारा (२), पुणे (१), सांगली (१), बीड (१), बुलडाणा (१), उस्मानाबाद (१), हिंगोली (१), नंदुरबार (१). यासाठी ७२ कोटींचे अनुदान प्रस्तावित आहे.

### खासगी गुंतवणूकदारांसाठी ‘मॅग्नेट’ प्रकल्पातून कशा प्रकारे सहकार्य मिळणार आहे?

शेतकरी उत्पादक संस्थाबरोबर मूल्य साखळी गुंतवणूकदार म्हणून खासगी गुंतवणूकदारांनाही संधी देण्यात आली आहे. काढणीपश्चात तंत्रज्ञानासाठी मोठ्या स्वरूपाच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी खासगी गुंतवणूकदारांमार्फत मोठे प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी देय असलेल्या पात्र प्रकल्प किमतीच्या ६० टक्के आणि कमाल ६ कोटींपर्यंत अनुदान तसेच कमी व्याजदरात मुदत कर्ज व खेळते भांडवल उपलब्ध होणार आहे. गरजेनुसार शेतकरी उत्पादक संस्थांकडून अशा प्रकल्पांसाठी लागणारा उच्च गुणवत्ता प्रतीचा कच्चा माल मुबलक प्रमाणात सतत उपलब्ध होणार आहे.

### महिला, दुर्बल घटक आणि दिव्यांग व्यक्तींकरिता प्रकल्पामध्ये कशाप्रकारे नियोजन आहे?

कृषी प्रक्रिया आणि उद्योग क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महिला संचालित शेतकरी उत्पादक संस्था आणि महिला मूल्य साखळी गुंतवणूकदार यांना मूल्य साखळीवृद्धीसाठी क्षमता विकास आणि पायाभूत सुविधांचा विकासाकरिता प्राधान्य दिले जाणार आहे. एकूण ३०० उपप्रकल्पांपैकी २० टक्के प्रकल्प हे महिला, दुर्बल घटक, व दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी राखीव आहेत. मॅग्नेट प्रकल्पांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने निर्माण झालेले ‘सीएमआरसी’ यांचा ११ निवडक फलोत्पादन पिकांच्या मूल्य साखळ्यांमध्ये सक्रिय सहभागासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.



शेतीमाल साठवणुकीसाठी आधुनिक शीतगृह.

#### प्रकल्पाचे मुख्य उद्देश

- फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे, साठवणूक क्षमता वाढविणे.
- बाजारपेठेच्या मागणीनुसार शेतीमालाचे मूल्यवर्धन, वितरण व्यवस्था कार्यक्षम करणे.
- शेतकरी उत्पादक संस्थांचा मूल्यसाखळीतील सहभाग आणि क्षमता विकास.
- उत्पादक कंपन्यांना तांत्रिक साहाय्य, पायाभूत सुविधा उभारणीसाठी साह्य, मध्यम मुदत कर्ज आणि खेळते भांडवल उपलब्ध करण्यासाठी वित्तीय संस्थांसोबत करार.
- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या १६ सुविधांचे विस्तारीकरण आणि आधुनिकीकरण.



अत्याधुनिक शेतीमाल प्रक्रिया उद्योग.

☎ : ०२०- ६७०६००००
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत
महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट)
प्रकल्प, पुणे
**प्रकल्प व्यवस्थापन कक्ष** : ३८६/२,
१० वा मजला, शारदा चेंबर्स, शंकरशेठ
रोड, पुणे - ४११०३७
: projectadb@msamb.com

(शब्दांकन : **गणेश कोरे**)

# राज्यात पहिल्यांदाच बाजार समितीचे रँकिंग

## नाशिकच्या लासलगाव बाजार समितीने पटकावला पहिला क्रमांक

**पुणे** : राज्यात पहिल्यांदाच बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी (रँकिंग) जाहीर करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजार समितीने राज्यातील ३०५ बाजार समित्यांमध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर जिल्ह्यातील बारामती बाजार समितीने नववा क्रमांक पटकावला आहे. पणन संचालनालयाकडून यापुढे दरवर्षी अशी बाजार समित्यांची रँकिंग जाहीर करण्यात येणार आहे.

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत २०२१-२२ च्या कामगिरीच्या आधारावर ही वार्षिक क्रमवारी जाहीर



केल्याची माहिती राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांनी दिली. जागतिक बँकेच्या मदतीने हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. यामुळे शेतीमाल विक्रीसाठी नेत असलेल्या बाजार ▶▶ पान ७ वर...

### पुण्यात या तीन बाजार समित्यांची बाजी

राज्यातील सहकार विभागाच्या रचनेनुसार आठ विभागांत प्रथम तीन बाजार समित्यांची नावेही जाहीर करण्यात आलेली आहेत. पुणे विभागात बारामती बाजार समितीने पहिला क्रमांक पटकावला आहे. तर अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर आणि सोलापूर जिल्ह्यातील अकलूज बाजार समितीने अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकावला आहे.

Punyanagari Dt. 02/09/2022

Punyanagari Dt. 02/09/2022

# राज्यात पहिल्यांदाच बाजार...

समितीचे स्थान शेतकऱ्यांना समजणार आहे. बाजार समित्यांची रँकिंग निश्चित करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधेनुसार ३५ निकष आणि २०० गुणांच्या आधारे ही निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये पायाभूत सुविधा व इतर सेवा-सुविधा अंतर्गत १४ निकष असून, त्यासाठी एकूण ८० गुण, आर्थिक कामकाजाबाबत ७ निकष आणि ३५ गुण, वैधानिक कामकाजाबाबत ११ निकष, ५५ गुण तर योजना उपक्रमातील सहभाग व इतर विषयी ३ निकष असून, त्यासाठी ३० गुण असे एकूण २०० गुणांवर आधारित ही क्रमवारी असणार आहे.

बाजार समितीचे नाव आणि रँकिंगनुसार राज्यात मिळालेला क्रमांक : लासलगाव (जि. नाशिक) पहिला, हिंगणघाट (जि. वर्धा), दुसरा, कारंजा (लाड) (जि. वाशिम) तिसरा, संगमनेर (जि. अहमदनगर) चौथा विभागून, मंगरूळपीर (जि. वाशिम) चौथा विभागून, चांदूर बाजार (जि. अमरावती) चौथा विभागून, वाशिम (जि. वाशिम) चौथा विभागून, काटोल (जि. नागपूर) पाचवा, अकोला (जि. अकोला), सहावा, उमरेड

www.pudhari.com Dt. 02/09/2022



# पुणे बाजार समिती 'टॉपटेन'मध्ये नाही

## मुंबई, नागपूरलाही मिळाले नाही स्थान; समित्यांची वार्षिक क्रमवारी प्रथमच जाहीर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**राज्यात आर्थिक उलाढाल आणि बाजार शुल्क तथा सेसमध्ये अग्रेसर असलेल्या मुंबई, पुणे आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला पणन संचालनालयाने जाहीर केलेल्या क्रमवारीत पहिल्या १० बाजार समित्यांमध्ये स्थान मिळविता आलेले नाही. राज्यातील ३०५ बाजार समित्यांमध्ये मुंबई ७५, पुणे ३३ आणि नागपूर बाजार समिती १७ व्या स्थानापर्यंत खाली घसरल्याचे स्पष्ट झाले आहे.**

- **राज्यात लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती प्रथम**
- **पुणे विभागात बारामती, दौंड, अकलूज बाजार समितीचा समावेश**
- **उलाढाल, उत्पन्नांबरोबरच अन्य निकषांमध्ये बसण्याचे आव्हान**

"बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर झाल्यामुळे इतर बाजार समित्यांच्या तुलनेत आपण शेतमाल नेत असलेल्या बाजार समितीचे स्थान शेतकऱ्यांना समजणार आहे. तसेच यामुळे शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्याची निकोप स्पर्धा बाजार समित्यांमध्ये निर्माण होण्यास चालना मिळेल. बाजार समितीचा विकास करताना नेमक्या कोणत्या बाबींना प्राधान्य दयायचे आहे, याची स्पष्टता या क्रमवारीमुळे बाजार समित्यांच्या संचालक मंडळास येणार आहेत. उत्कृष्ट कामगिरी केलेल्या बाजार समित्यांचे अभिनंदन.

**सुनील पवार**, पणन संचालक, पुणे.

बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी केलेल्या निकषांमध्ये शेतकरी मालाची आवक हाच मुद्दा या बाजार समित्यांना पिछाडीवर टाकण्यास कारणीभूत ठरल्याचे सांगण्यात आले. कारण, व्यापारी मालाची आवक या समित्यांमध्ये अधिक आहे. शिवाय शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा व इतर सुविधा, आर्थिक कामकाज, वैधानिक कामकाज या सर्वच आघाड्यांवर मोठ्या बाजार समित्यांनाही कसोशीने उतरावे लागणार आहे. कारण केवळ उलाढाल आणि उत्पन्न असून चालणार नाही, तर आर्थिक शिस्तही त्यांना पाळावी लागेल आणि अन्य निकषांमध्ये त्यांना बसावे लागेल. तरच त्यांचा क्रम हा वरच्या क्रमांकावर येण्याची अपेक्षा असल्याची माहितीही पणन विभागातून देण्यात आली.

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत (स्मार्ट) राज्यातील बाजार समित्यांची सन २०२१-२२ या वर्षाच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी (रँकिंग) पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ३०५ बाजार समित्यांपैकी नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजार समितीने प्रथम क्रमांक पटकाविला असून, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट बाजार समितीने दुसरा, तर वाशीम जिल्ह्यातील कारंजा (लाड) बाजार समितीने तिसरा क्रमांक मिळविला आहे.

राज्यामध्ये प्रथमच अशा प्रकारे बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी जाहीर करण्यात आल्याची माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी दिली. बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी पणन संचालनालय कार्यालयाकडून जागतिक बँकेच्या सूचनेनुसार तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेमध्ये बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, योजना, उपक्रम राबविण्यातील सहभाग यानुसार ३५ निकष तयार करण्यात आलेले होते. गुणांच्या आधारावर राज्यातील बाजार समित्यांची सन २०२१-२२ या वर्षाची क्रमवारी निश्चित करण्यात आलेली आहे. त्या क्रमवारीनुसार राज्यातील पहिल्या १० बाजार समित्यांची नावे व कंसात त्यांना मिळालेले गुण खालीलप्रमाणे आहेत.

लासलगाव- नाशिक(१६३), हिंगणघाट- वर्धा(१६१.५०), कारंजा लाड- वाशीम (१६१), संगमनेर-अहमदनगर (१५७), मंगरुळपीर- वाशीम (१५७), चांदूर बाजार-अमरावती (१५७), वाशीम-वाशिम (१५७), काटोल-नागपूर (१५६), अकोला-अकोला (१५५.५०), उमरेड-नागपूर (१५५), लातूर-लातूर (१५०), बारामती-पुणे (१४९.५०), पिंपळगाव ब.-नाशिक(१४८.५०) या बाजार समित्यांचा समावेश आहे. राज्यातील सहकार विभाग रचनेनुसार नाशिक विभाग : लासलगाव- नाशिक, संगमनेर-अहमदनगर, पिंपळगाव ब. - नाशिक. पुणे विभाग : बारामती-पुणे, दौंड-पुणे, अकलूज-सोलापूर. कोल्हापूर विभाग : सांगली-सांगली, फलटण-सातारा, आटपाडी-सांगली.

Maha.Times 02/09/2022

# पुणे विभागात बारामती बाजार समिती अव्वल

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राज्यातील बाजार समित्यांची कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी (रँकिंग) पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील लासलगावच्या बाजार समितीने राज्यात पहिला क्रमांक, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट बाजार समितीने दुसरा क्रमांक मिळविला आहे. क्रमवारीत बारामती बाजार समितीने नववा क्रमांक मिळविला आहे. पुणे विभागात बारामतीच्याच बाजार समितीने अव्वल क्रमांक मिळविला आहे.

पणन संचालक सुनील पवार यांनी ही माहिती दिली. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यातील बाजार समित्यांची २०२१ ते २२ या वर्षाच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी जाहीर करण्यात आली. राज्यातील एकूण ३०५ बाजार समित्यांमधून क्रमवारी जाहीर करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजार समितीने पहिला क्रमांक, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट बाजार समितीने दुसरा आणि वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) बाजार समितीने तिसरा क्रमांक पटकावला आहे.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध करणे हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी पणन संचालनालयाकडून जागतिक बँकेच्या सूचनेनुसार; तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत सुविधा, योजना किंवा उपक्रम राबविण्यातील सहभागानुसार ३५ निकष तयार करण्यात आले होते.

**“ राज्याच्या बाजार व्यवस्थेतील रँकिंगचा हा पहिलाच प्रयत्न आहे. यापुढे दर वर्षी अशाच प्रकारे बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर करण्यात येणार आहे. क्रमवारीच्या अनुभवाच्या आधारावर पुढील वर्षी क्रमवारीच्या निकषात आणि गुणांकन पद्धतीत आवश्यकतेनुसार काही सुधारणा करण्यात येणार आहेत.**

**– सुनील पवार**, संचालक, पणन संचालनालय

## तीन बाजार समित्यांची बाजी

राज्यातील सहकार विभागाच्या रचनेनुसार आठ विभागांतील पहिल्या तीन बाजार समित्यांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. पुणे विभागात बारामती बाजार समितीने पहिला क्रमांक पटकावला आहे. नगर जिल्ह्यातील संगमनेर आणि सोलापूर जिल्ह्यातील अकलूज बाजार समितीने अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकावला आहे.





### बक्षीसपात्र बाजार समित्यांची यादी

| बाजार समिती | जिल्हा | क्रमांक |
|---|---|---|
| लासलगाव | नाशिक | पहिला |
| हिंगणघाट | वर्धा | दुसरा |
| कारंजा (लाड) | वाशिम | तिसरा |
| संगमनेर | नगर | चौथा विभागून |
| मंगरूळपीर | वाशिम | चौथा विभागून |
| चांदूर बाजार | अमरावती | चौथा विभागून |
| वाशिम | वाशिम | चौथा विभागून |
| काटोल | नागपूर | पाचवा |
| अकोला | अकोला | सहावा |
| उमरेड | नागपूर | सातवा |
| लातूर | लातूर | आठवा |
| बारामती | पुणे | नववा |
| पिंपळगाव बसवंत | नाशिक | दहावा |